महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी
MSSDS
पहिला मजला ,एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय परिसर,
३, धोबी तलाव, महापालिका मार्ग, मुंबई — ४००००१
ईमेल: ceo@mssds.in दूरध्वनी क्र .०२२ २२६२५६५१/५३

जा.क्र.MSSDS/PFI/B-१६/२०२०-२१/१२०३ दि. १०.०८.२०२१

## परिपत्रक

**विषय : महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत प्रशिक्षण संस्था सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.**

महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीमार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेंतर्गत महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन, मंत्रालय यांच्याकडील दि. ४.४.२०२१ रोजीच्या परिपत्रकांन्वये कोव्हीड-१९ चा वाढता प्रादुभार्व रोखण्यासाठी राज्यात पुन्हा लॉकडाऊन करण्यात आल्यामुळे जिल्हास्तरावर निर्गमित करण्यात आलेल्या आदेशान्वये सर्व प्रशिक्षण संस्था बंद ठेवण्यात आल्या होत्या.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग यांचे दि.०६.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीअंतर्गत सूचीबद्ध प्रशिक्षण संस्थाकडून देण्यात येणारे कौशल्य प्रशिक्षण सुरु करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

तरी, प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्याकरिता प्रशिक्षण संस्थांकडून खालील दिलेल्या सूचनांचे तंतोतत पालन करण्यात यावे.

- महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन, मंत्रालय यांच्यांकडून निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.
- केंद्र सरकारद्वारे कोव्हीड-१९ संबंधी वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे.
- Ministry of Health & Family Welfare (MoHFW) यांच्यामार्फत प्रमाणित मार्गदर्शक सूचनांमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीचे प्रशिक्षण संस्थांकडून पालन करण्यात यावे.
- जिल्हास्तरावरून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, यांच्याकडून कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना म्हणून निर्गमित करण्यात आलेल्या आदेशाचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

- कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रशिक्षणापुर्वी, प्रशिक्षणा दरम्यान आणि प्रशिक्षणा नंतरकरिता निर्गमित करण्यात आलेल्या सर्व नियमांचे व सूचनांचे (Compulsory Face Mask, Screening & Hygiene, Frequent Sanitization, Social Distance, etc.) पालन करण्याची दक्षता प्रशिक्षण संस्थांकडून घेण्याबाबतची सविस्तर मार्गदर्शक सूचना सोबत जोडण्यात येत आहे.

दीपेन्द्र सिंह कुशवाह (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी**

**सोबत :-** १. शासनाचे दि.०६.०८.२०२१ रोजीचे पत्र
२. मार्गदर्शक सूचना

**प्रति,**
सर्व व्यवसायिक प्रशिक्षण संस्था

**प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव,**

१. मा. प्रधान सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, कोंकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
३. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.
४. उपसंचालक,दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान, वरळी, मुंबई.
५. उप आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागीय आयुक्तालय (नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, मुंबई, पुणे)
६. सर्व सहाय्यक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र.

## प्रशिक्षण संस्थेद्वारे कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता मार्गदर्शक सूचना

१. प्रशिक्षण संस्थेची स्वच्छता राखणे
- ✓ खालील नमूद संस्थेतील सर्व क्षेत्र निर्जंतुक झाल्याची खात्री करण्यात यावी.
- ✓ इमारतीचे प्रवेशद्वार, कार्यालय इ.
- ✓ कॅफेटेरिया आणि कॅन्टीन.
- ✓ वर्गखोल्या, प्रयोगशाळा, व्हरांडा सारखी मोकळी जागा
- ✓ लॅब उपकरणे
- ✓ शौचालय, सिंक इ.
- ✓ भिंती/इतर सर्व पृष्ठभाग
- ✓ परिसरात प्रवेश करणारी सर्व यंत्रे स्प्रे करून निर्जंतुकीकरण करणे अनिवार्य आहे.

२. प्रशिक्षण संस्थेतील अधिकारी/कर्मचारी यांची आरोग्य आणि स्वच्छता
- ✓ सॅनिटायझर आणि इतर आवश्यक साहित्याची उपलब्धता
- ✓ कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना आवश्यक उपाययोजनांचे प्रशिक्षण देणे.
- ✓ प्रशिक्षक यांचे Vaccination चे दोन्ही डोस लवकरात लवकर पूर्ण होण्याबाबतची दक्षता प्रशिक्षण संस्थांकडून घेण्यात यावी.

३. कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता जागृकता निर्माण करणे.
- ✓ हात धुण्याच्या पद्धतीचे जाहीरातीचे पोस्टर लावणे.
- ✓ कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आवश्यक उपाय योजनांचे उमेदवारांना प्रशिक्षण देणे.
- ✓ Vaccination घेण्याकरिता उमेदवारांना प्रोत्साहित करणे.

४. प्रशिक्षणादरम्यान कोव्हीड-१९ च्या संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी
- ✓ प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून साहित्याची उपलब्धता करून देण्यात यावी.
- ✓ उमेदवारदरम्यान Social Distance पाळण्याची दक्षता घेण्यात यावी.
- ✓ प्रशिक्षक व उमेदवारांनी Face Mask घालणे अनिवार्य राहील.

५. प्रशिक्षणानंतर
- ✓ वर्ग/ संस्था सोडताना सामाजिक अंतरांचे नियम पाळले जावेत.
- ✓ प्रशिक्षण संस्था स्वच्छ व निर्जंतुकीकरण करण्यात यावी.
- ✓ प्रशिक्षक व उमेदवारांनी Face Mask घालणे अनिवार्य राहील.